# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

### विद्यापीठ स्तरावर घेतलेल्या परीक्षांतर्गत छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मधील हिवाळी सत्र परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षांमधील सोबत जोडलेल्या अभ्यासक्रमांचे निकाल मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या **https://onlineresults.unipune.ac.in/Result/Dashboard/Default** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आलेले आहेत.

सोबत जोडलेल्या परीक्षेतील निकालप्राप्त सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येत आहे की आपण २३ फेब्रुवारी २०२६ ते ०४ मार्च २०२६ या कालावधीत जर आपणास आपल्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत हवी असेल तर, सशुल्क अर्ज करावेत. दि. ०५ मार्च २०२६ नंतर विद्यार्थ्यांना छायांकित प्रत उपलब्ध होईल. छायांकित प्रत उपलब्ध होताच या विद्यार्थ्यांना जर त्यांना गुणपडताळणीत / शंका एखादा प्रश्न तपासला नसेल, असे आढळल्यास त्यांनी गुणपडताळणीसाठी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध होताच पाच दिवसात विनाशुल्क अर्ज करावेत. परंतु ज्या विद्यार्थ्यांना आपल्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करायचे आहे त्यांनी छायांकित प्रत मिळाल्यावर पुनर्मूल्यांकनासाठी सशुल्क अर्ज करावेत.

त्यानंतर गुणपडताळणीचा काही भाग तपासायचा राहून गेला असल्यास त्याची खातरजमा, किंवा पुनर्मूल्यांकन झाल्यानंतर अनुरूप गुणप्रदर्शन विद्यार्थ्यांच्या ग्रेडशिटमध्ये प्रदर्शित होईल. तसेच गुणबदलाची पुन्हा खात्री करायची असेल तर विद्यार्थ्यांस विहित मुदतीतच पुन्हा ऑनलाईन सशुल्क अर्ज करावा लागेल, त्यानंतर प्रत्यक्ष गुणबदलाची छायांकित उत्तरपत्रिका विद्यार्थ्यास त्यांच्या प्रोफाईलमध्ये प्रदर्शित होईल. हे परिपत्रक संबंधित सर्व घटकांस तात्काळ ध्यानात आणून द्यावे.

( प्रा. डॉ. प्रभाकर देसाई )
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा. क्र. परीक्षा छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन कक्ष/ ०५५ दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२६.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

## जाहीर प्रकटन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मधील हिवाळी २०२५ सत्र परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर परीक्षांच्या खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांचे निकाल विद्यापीठाच्या https://onlineresults.unipune.ac.in/Result/Dashboard/Default या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आलेले आहेत.

| Sr. No. | Name of Examination & Pattern |
|---|---|
| 1 | Second Year BACHELOR OF BUSINESS ADMINISTRATION(2019 Pattern) |
| 2 | Third Year BACHELOR OF BUSINESS ADMINISTRATION(2019 Pattern) |
| 3 | Second Year BACHELOR OF SCIENCE (HOSPITALITY STUDIES)((REV. 19)) |
| 4 | Third Year BACHELOR OF SCIENCE (HOSPITALITY STUDIES)((REV. 19)) |
| 5 | Second Year BACHELOR OF SCIENCE (ANIMATION)((PATT. 2021)) |
| 6 | Third Year BACHELOR OF SCIENCE (ANIMATION)((PATT. 2021)) |
| 7 | First Year M.Sc.(IMCA)(2023 Pattern (NEP 2020)) |
| 8 | Second Year M.Sc.(IMCA)(2023 Pattern (NEP 2020)) |
| 9 | First Year M.Sc. Computer Applications(2020 Pattern) |
| 10 | Second Year M.Sc. Computer Applications(2020 Pattern) |

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.परीक्षा/एस अॅण्ड टी/२३२
दिनांक : १७/०२/२०२६

प्रत माहितीसाठी :

१. मा. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्र—कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ
४. सहायक कुलसचिव, छायांकित प्रत व पुनर्मुल्यांकन कक्ष
५. सहायक कुलसचिव, जनसंपर्क कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

Scanned with OKEN Scanner